रविवार, दि. ११ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# परराष्ट्र मंत्रालयाकडून शस्त्रविरामची घोषणा



**नवी दिल्ली -** पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांनी भारताच्या डीजीएमआय यांच्याशी आज दुपारी ३.३५ वाजता फोनवरून चर्चा केली. दोघांमध्ये दोन्ही बाजूंकडील गोळीबार, जमिनी लष्करी कारवाई तसेच हवाई आणि समुद्री कारवाई भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी ५ वाजल्यापासून थांबवण्याबाबत एकवाक्यता झाली. याबाबतच्या सूचना दोन्ही बाजूंना देण्यात आल्या आहेत. १२ मे रोजी दुपारी १२ वाजता दोन्ही देशांचे डीजीएमओ चर्चा करतील, अशी माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिली आहे.



जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव चांगलाच वाढला होता. दरम्यान दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारताने पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या नियंत्रणात असलेल्या जम्मू काश्मीर येथील दहशतवादी तळांवर हल्ला केला होता. यानंतर पाकिस्तानकडून आंतरराष्ट्रीय सीमेवर वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात होते. भारतातील अनेक ठिकाणी पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्याला भारतीय लष्कराने वेळोवेळी सडेतोड प्रत्युत्तर दिले. यादरम्यान आज भारत आणि पाकिस्तान यांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये फोनवरून चर्चा झाली आणि दोन्ही देशांचे शस्त्रविरामाच्या मुद्द्यावर एकमत झाल्याचे पाहायला मिळाले. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती दिली आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज दुपारी साडे तीनच्या सुमारास पाकिस्तानच्या डीजीएमओंनी भारताच्या डीजीएमओंना फोन केला. दोन्ही अधिकार्यांमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान त्यांच्या शस्त्रविरामावर एकमत झाले. त्यानुसार संध्याकाळी ५ वाजल्यापासून दोन्ही देशांकडून होणारे हल्ले थांबवण्यात आल्याचेही मिस्री यांनी सांगितले. दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये १२ मे म्हणजेच सोमवारी दुपारी १२ वाजता चर्चेची पुढची फेरी होणार आहे.

दरम्यान, भारताच्या परराष्ट्र विभागाच्या पत्रकार परिषदेआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमध्ये शस्त्रविरामावर सहमती झाल्याची पोस्ट ट्रूथ सोशलवर केली होती. रात्रभर अमेरिकेच्या मध्यस्थीने सविस्तर चर्चा केल्यानंतर भारत व पाकिस्तानने पूर्णपणे व तातडीने शस्त्रविराम करण्यावर सहमती दर्शवल्याची घोषणा करताना मला आनंद होत आहे. यासाठी मी दोन्ही बाजूंचं अभिनंदन करतो, असं ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले होते.

भारत पाकिस्तान यांच्यातल शस्त्रविरामाच्या मुद्द्यावर अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट मार्को रु रुबियो यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. ज्यामध्ये ते म्हणाले की, गेल्या ४८ तासात व्हीपी व्हान्स आणि मी भारत आणि पाकिस्तानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करत होतो, ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शेहबाज शरिफ, परराष्ट्र मंत्री सुब्रह्मन्यम जयशंकर, चीफ आर्मी स्टाफ असिम मुनिर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि असिम मलिक यांचा सम ावेश होता. मला जाहीर करताना आनंद होतो आहे की भारत आणि पाकिस्तान सरकारने तात्काळ शस्त्रविरामावर सहमती दर्शवली आहे आणि एका तटस्थ ठिकाणी यासंबंधीच्या मुद्द्यांवर चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शविली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच, ७ मे रोजी भारताने एअर स्ट्राईक केल्यानंतर दोन्ही देशांत युद्धजन्य परिस्थिती सुरू झाली होती, अखेर या युद्ध कारवाईला विराम मिळाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन यासंदर्भात माहिती दिल्यानंतर भारत सरकारने देखील अधिकृतपणे घोषणा केली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली. पाकिस्तानकडून ३.३५ वाजता फोन आला, त्यानंतर आज सायंकाळी ५ वाजल्यापासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी लागू होत असल्याचं त्यांनी जाहीर केलं. त्यानंतर, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ट्विट करुन युद्धविरामाची माहिती दिली. तसेच, दहशतवादाविरूद्धची भारताची भूमिका आजही कायम असल्याचे पाकिस्तानला ठणकावलं आहे. ''भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गोळीबार आणि सैन्य दलाच्या कारवायांना थांबविण्यास दोन्ही बाजूंनी सहमती दर्शविण्यात आली आहे. पण, भारताने सर्वच ताकदीनीशी दहशतवादाविरुद्ध आपली भूमिका सातत्याने स्पष्ट केली. सैन्य कारवाया थांबल्या पण दहशतवादाविरुद्धची हीच भूमिका यापुढे देखील कायम राहिल'', असे ट्विट परराष्ट्रमंत्र्यांनी केलं आहे. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारतानं शस्त्रसंधीचा निर्णय घेतला. या सगळ्यात भारतानं अनेक गोष्टी साध्य केल्या.

**दहशतवादाविरोधात कठोर भूमिका**

कोणत्याही प्रकारचा दहशतवादी आमच्या भूमीवर सहन केला जाणार नाही, असा संदेश ऑपरेशन सिंदूर राबवत भारतानं दिला. भारतानं पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळ उडवले. दहशतवादी हल्ले सहन करणार नाही. हल्ले केले तर घुसून मारु, हा संदेश भारतानं स्पष्टपणे दिला.

**दहशतवाद्यांची फॅक्टरी उद्ध्वस्त**

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळ भारतीय सैन्यानं जमीनदोस्त केलं. पीओकेमधील ५, पाकिस्तानातील ४ दहशतवादी तळ नेस्तनाबूत करण्यात आले. यामध्ये जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तय्यबाच्या मुख्यालयांचा समावेश आहे. पाकिस्तान **पान ३ वर**

युवा आदर्श

## उन्हाळी सुट्टी ...

संपली बुवा परिक्षा
झाली मुले मोकळी
गेला सगळा तणाव
खुलू लागली पाकळी
काय करायचे आतां
सुरु तोंडाची टकळी
अभ्यास उत्साह तोचं
फुटाया लागे उकळी
आता पालक परिक्षा
जपायची नीट कळी
वेळ भरपूर रिकामा
मुले असतात खुळी
अपाय होण्या आधी
रे उपाय करावा वेळी
जाणून छंद आवडी
द्यायची दिशा आगळी
समर व्हेकेशन खाली
दाबू नकात भाबळी
अपेक्षा ओझे डोईवर
रचूनि ठेवतो सापळी
कुंपण घाली अनिच्छे
टोचत राहते बाभळी
गढूळ करे वातावरण
भल्या प्रवाहा निर्मळी
आपल्या अपेक्षा फास
भोवती त्यांचे आवळी
मुले असावीचं अव्वल
तोडा प्रथेची साकळी

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# वीजग्राहक आपले दैवत ; त्यांना सर्वोत्कृष्ट सेवा द्या - औंढेकर

## जालन्यात वीज कर्मचाऱ्यांशी संवाद मेळावा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** वीजग्राहक आपले दैवत आहेत. त्यांना अखंडित वीजपुरवठ्यासह सर्वोत्कृष्ट सेवा द्या. तसेच वीजबिलांच्या १०० टक्के वसुलीसह वीजचोरी रोखण्याकडेही कटाक्षाने लक्ष द्या, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांनी केले. जालन्यातील मातोश्री लॉन्स येथे शनिवारी (१० मे) जिल्ह्यातील जनमित्र, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा संवाद मेळावा पार पडला. यावेळी औंढेकर बोलत होते. या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता संजय सरग, प्रभारी उपमहाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना औंढेकर म्हणाले की, जनमित्र (लाईनमन) हा महावितरणचा चेहरा आहे. सर्व जनमित्रांनी नेहमी गणवेशात रहावे. त्यामुळे जनमानसात सकारात्मक संदेश जातो. कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साधने दिली जातील. कर्मचाऱ्यांनी विद्युत यंत्रणेवर काम करताना त्याचा कटाक्षाने वापर करावा.

जालना जिल्ह्यात उच्चदाब ग्राहकांकडून सर्वाधिक महसूल जमा होतो हे भूषणावह आहे. जिल्ह्यातील ग्राहकांना दैवत मानून त्यांची इमानेइतबारे सेवा करा. ग्राहकांना सुरळीत वीज व सर्वोत्तम सेवा दिली तर वीजबिल वसुली करणेही सोपे जाते. यावेळी मार्च महिन्यात केलेल्या वीजबील वसुलीचे कौतुक करत, गावांची थकबाकी शून्य केलेल्या तीन जनमित्रांचा औंढेकर यांनी सत्कार केला. वीजबिल वसुलीवरच महावितणचा डोलारा




उभा आहे. त्यामुळे प्रत्येक महिना हा मार्च समजूनच प्रत्येकाने कार्यरत रहायला हवे, अशा सूचना त्यांनी केल्या. ग्राहकांच्या वीजबिल दुरुस्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढाव. यासाठी जनमित्रांसह लेखा कर्मचाऱ्यांनीही पुढाकार घ्यावा, जेणेकरून **पान ३ वर**

# दृष्टी लायन्स नेत्रालय परतूर येथे शेतकरी मार्गदर्शन शिबिर संपन्न



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर येथील लायन्स क्लब च्या वतीने शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.दृष्टी लायन्स नेत्रालयाने दर महिन्याला शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्याचे ठरविलेले असतांना याही महिन्यात शिबिर घेण्यात आले. या महिन्याचा विषय शेतकऱ्यां साठी शासकीय **पान ३ वर**

# बनावट लग्न लावणाऱ्यांना टेंभुर्णी पोलिसांकडून अटक

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** बनावट लग्न लावणाऱ्या आरोपींना टेंभुर्णी पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. सविस्तर वृत्त असे की, दिनांक ९ मे रोजी फिर्यादी नामे अनिल श्रीराम फदाट राहणार खाम खेडा तालुका जाफराबाद, यांनी दिलेल्या तक्रारीवरून टेंभुर्णी पोलिसांनी गुन्हा रजिस्टर नंबर १०४/ २०२५ कलम ३१८ (४),३(५) भा. न्या संहिता गुन्हा रजिस्टर करून आरोपींना बोगस लग्न लावून दागिने वरोख रक्कम घेऊन पळून जाऊन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्ह्यामध्ये आरोपी नामे कल्याणी मजर कुरेशी वय २९ वर्ष राहणार रामनगर, अम रावती, हल्ली मुक्काम माळीपुरा वार्ड क्रमांक पाच राळेगाव जिल्हा यवतमाळ, शेख पाशा शेख ताजु वय ४५ वर्ष राहणार नेर तालुका जिल्हा जालना, हल्ली मुक्काम पाण्याच्या टाकीजवळ, जाफराबाद तालुका जाफराबाद जिल्हा जालना यांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता माननीय न्यायालयाने त्यांना ११ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावलेली आहे. सद्यस्थितीत ते अटक कोठडीमध्ये आहें. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार **पान ३ वर**



# जालना क्रेडाईतर्फे कामगार कृतज्ञता सप्ताह साजरा

**जालना । प्रतिनिधी -** बांधकाम व्यवसायाची खरी ताकद म्हणजे कामगारांची मेहनत, त्यांच्यावरील निष्ठा आणि सातत्य. याच मेहनती हातांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जालना क्रेडाईतर्फे १ मे या कामगार ७ मे पर्यंत 'कामगार कृतज्ञता सप्ताह' साजरा करण्यात आला.

या सप्ताहाचा प्रारंभ जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्या हस्ते फीत कापून झाला. अध्यक्षस्थानी जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार होते. याप्रसंगी क्रेडाईचे उपाध्यक्ष अविनाश भोसले, सचिव चेतन मराठे, कोषाध्यक्ष सिद्धांत शर्मा, दीपक आंभोरे, केदार जाधव, शरद बारगजे, दीपक बदर, कृष्णा पवार, कृष्णा लोखंडे, शेखर जयस्वाल आदींची **पान ३ वर**




## महाबोधी बुध्द विहार बौध्दांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी जालना येथून भिमसैनिकांचा जत्था बौध्दगयेसाठी रवाना




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय बौध्द महासभेच्या वतीने जालना येथून ५० भिम सैनिकांचा जथा बौध्दगयेसाठी रवाना झालाय. महाबोधी बौध्द विहार हे बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे आणि त्यासाठी सुरु असलेल्या आंदोलनात जालना येथील भिम सैनिकांचा सहभाग असावा यासाठी हे भिम सैनिक रवाना झालेत. भारतीय बौध्द महासभेच्या वतीने बौध्द धम्म सहल आणि महाबोधी बुध्द विहार मुक्ती आंदोलनात सहभागी होण्यासाठी नियोजन **पान ३ वर**

## संपादकीय

### राष्ट्रीय तंत्रज्ञान...

आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय

आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन ११ मे २०२५ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय-बापा शिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील,माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार,संस्कृती, जडणघडण,रहनसहन सर्वत्र दिसून येते.ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची)जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे. कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई-वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे.परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही.फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुल-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.मातृत्व दिन(मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी,आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांच नात. वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते. कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते.परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न-भूतो-न-भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे. कारण वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहे त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविन आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते. कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा. दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दुःख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई- वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल. परंतु असे व्हायला नको असे मला वाटते. आपण ११ मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# अत्त दीप भव! तू स्वयं दीप हो!!

वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला तसेच त्यांना त्याच दिवशी ज्ञान प्राप्ती झाली व महापरिनिर्वाण झाले असा हा एकत्रित दिवस आहे.

१२ मे २०२५ सोमवारी वैशाखी पौर्णिमा आहे.

गौतम बुद्धाने सिद्धार्थाच्या रूपात जन्म घेतला. त्यांनी त्यांनी गृहस्थ जीवनात प्रवेश केला त्यानंतर त्यांनी पत्नी व मुलाचा त्याग करून कौटुंबिक मोहमाया पासून अलिप्त होऊन बौद्ध धर्माचे प्रवर्तक झाले.

त्यांनी करुणा- सत्य- आणि अहिंसेला आपल्या जीवनाचा आधार मानले. आणि लोकांनाही याच मार्गावरून मार्गक्रमण करण्यासाठी प्रवृत्त केले आणि त्यामुळे अनेकांनी आपल्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणला.

गृहत्यागानंतर सिद्धार्थ गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खूप चिंतन केले, कठोर तपस्या केली. आताच्या बिहार राज्यातील गया येथे निरंजना नदीच्या काठावर पिंपळाच्या वृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली. या 'दिव्य ज्ञाना'ला ''‘बुद्धत्व’ किंवा 'निर्वाण' असेही म्हणतात. ज्ञानप्राप्तीनंतर सिद्धार्थ गौतमाला सर्वजण 'बुद्ध' असे म्हणू लागले. बुद्ध ही व्यक्ती नव्हे ती ज्ञानाची अवस्था आहे. 'बुद्ध' म्हणजे अतिशय ज्ञानी मनुष्य. बुद्धांना ज्या पिंपळाच्या वृक्षाखाली 'बुद्धत्व' प्राप्त झाले त्या वृक्षाला 'बोधिवृक्ष' (ज्ञानाचा वृक्ष) असे म्हणतात.

भगवान बुद्ध म्हणतात मानवी जीवन हे दुःखमय आहे. दुःखाची निर्मिती त्रुष्णेतून होते .वासना. इच्छा, आवड, आसक्ती, आणि म्हणून या त्रुष्णेवर नियंत्रण ठेवायला पाहिजे. मानवी व्यवहारांच्या मुळाशी चार आर्य सत्य आहेत. दुःख, तृष्णा, निरोध, प्रतिपद. दुःख निवारणा साठी सदाचाराचा मार्ग, अष्टांग मार्ग आहेत. या गोष्टीच्या पालनाने मानवाचे जीवन सुखमय होते. कर्म ,प्रेम, आनंद , शांतता याविषयी भगवान गौतम बुद्धाचे सुंदर आणि जीवन सुखी करणारे विचार आहेत.

**कर्माविषयीचा विचार**

✻ लोक तुमच्याशी कसे वागतात, हे त्यांचे कर्म आहे.पण तुम्ही त्यांच्याशी कसे वागतात हे तुमचे कर्म आहे.कोणाशीही वागतांना चांगले वागा. चांगलेच फळ मिळेल.

✻ दयाळूपणा दाखवा.प्रेमाने वागा. तुमचा हेतू चांगला आहे का बघा.तपासून पहा.दुसऱ्याला माफ करण्याची क्षमता ठेवा.

✻ तुमच्या बरोबर घडलेल्या वाईट गोष्टींना तुमचे कर्मच जबाबदार आहे,एक दिवस तुमच्या लक्षात येईल. कर्माची फळ तुम्हाला ईथेच भोगावी लागतात.

✻ तुम्हाला नेहमी काय योग्य वाटते तेच बोला. कोणत्याही गोष्टीसाठी दुःख करुन घेऊ नका.

✻ नेहमी चांगला विचार करा.दुसऱ्या बरोबर चांगले वागा,चांगले बोला.परिणामी तुमचे चांगलेच होईल.

✻ आपण काय विचार करतो,त्याप्रमाणे माणूस म्हणून आपण जगतो.आपण आपल्या विचारांनीच मोठे होत असतो.आपल्या विचारांनीच जग बनते



हे लक्षात ठेवा.

✻ कोणाचा सूड उगवू नका.आपल्या कर्माला त्याचे काम करु द्या.कोणतीही वाईट गोष्ट जास्त काळ टिकत नाही.

✻ चित्त हे पाण्या प्रमाणे आहे.थाऱ्यावर नसतं तेव्हा काहीच दिसत नाही.पाणी शांत असत तेव्हा तळही दिसतो.

✻ दुःख हे अजिबात टाळता येण्या सारखे नाही. पण त्यात किती रमून रहायचे ते आपल्या हातात आहे.पर्याय आपणच ठरवायचा आहे.

✻ रोज सकाळी आपला पुनर्जन्म होत असतो. आपण जे काही करतो ते आजच्या दिवसा पुरते ठेवा.अन्यथा आयुष्यभर त्रासच सहन करावा लागेल.

द्व आनंदा संबधी विचार.

✻ एका मेणबत्तीने तुम्ही हजारो मेणबत्या उजळू शकता.आनंदाचेही तसेच आहे.तुम्ही जितका आनंद वाटणार तितका तो वाढणार.वाटल्याने तो कधीच कमी होत नसतो.

✻ एखाद्याची प्रशंशा केल्याने दोघांचाही आनंद वाढेलच. पण तसे नाही केले तर तुम्हालाच अधिक दुःख मिळेल.

✻ आनंद मिळवण्याचा कोणताच मार्ग नाही.तर आनंद हाच सुखी होण्याचा मार्ग आहे.

✻ दुसरे कोणीही तुम्हाला आनंदी वा दुःखी करु शकेल असा विचार करणेच हास्यास्पद आहे.

✻ तुम्ही कोण आहात वा तुमच्याकडे काय आहे,यावर आनंद अवलंबून नाही,तर तुम्ही नक्की काय विचार करता,आणि कृती करता,यावर तुमचा आनंद अवलंबून आहे.

✻ शिस्तबध्द मन हे नेहमी आनंददायी असंत.

✻ जेव्हा सर्वकाही व्यवस्थित आहे हे तुम्ही जाणता,हाच खरा आनंद आहे.

✻ साठवण्यात काही असण्यात आनंद नाही,तर असलेल्या गोष्टी वाटण्यात आनंद आहे.

✻ कोणत्याही गोष्टी वाटल्याने आनंद कमी होत नसतो तर तो वाढतो.

✻ आनंद म्हणजे प्रवास आहे.प्रवासाचे शेवटचे ठिकाण नाही

**प्रेमा विषयी विचार**

✻ ज्याचे हजारो माणसांवर प्रेम आहे,त्यालाच माणसं सोडून जाण्याच त्यांच्या नसण्याच दुःख आहे.पण ज्याचे कोणावरच प्रेम नाही त्याला कोणताच त्रास नाही.

✻ जगात इतर कोणावरही अधिक प्रेम करण्यापेक्षा तुम्ही स्वतःवर प्रेम करण्यास पात्र आहात. स्वतःवर प्रेम करण्यास शिका.

✻ तुम्ही खरंच स्वतःवर प्रेम करत असाल तर तुम्ही कधीही दुस-याला दुखावू शकत नाही. कारण तुम्हांला नक्की त्याचा काय त्रास असतो याची पुरेपुर कल्पना असते.

✻ प्रेमाचा मार्ग ह घ्यावे हृदयात असतो. तो इतर ठिकाणी शोधू नका.

✻ प्रेम म्हणजे एखाद्याच्या आंतरिक परमात्म्याची ओढ.हे दोन जीव एकत्र आले की परिपूर्ण होतात. प्रेमाने जग जिंकता येते.

✻ कोणाचाही द्वेष करु नका.द्वेषाने आपलेच नुकसान होणार. त्यापेक्षा प्रकाश प्रेम करा त्याने सर्वकाही चांगलेच होईल.

**शांततेच्या बाबतीत विचार**

✻ चांगल्या शब्दाने मनाला शांतता मिळते. त्यामुळे नेहमी चांगलेच बोला.

✻ शांतता ही नेहमी मनातूनच येत असते.त्याचा कुठेही बाहेर शोध घ्यायला गेलात तर ती मिळणार नाही.

✻ जे संतापजनक विचारा पासून दूर रहातात त्यांना नेहमीच मानसिक शांतता मिळते. कारण त्यांचे मन शांत असते.मनात विचारांचे काहूर माजलेले नसते.

✻ नेहमी चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करा. हा प्रयत्न तुम्ही पुन्हा पुन्हा करत रहा.म्हणजे तुमच्या मनाला शांती आणि आनंद दोन्हीही गोष्टी मिळतील.

✻ आपल आयुष्य हे दुस-याच्या आयुष्याशी तुलना करीत राहिल्यास तुम्हाला मनःशांती कधीच मिळणार नाही.आपल्याकडे जे आहे त्यात आनंदाने रहा.

एक क्षण एक दिवस बदलू शकतो ।एक दिवस आयुष्य बदलू शकतो। आणि एखाद्याचे आयुष्य हे संपूर्ण जग बदलू शकतो.


वैशाखी पौर्णिमेला सिद्धार्थ पिंपळाच्या झाडाखाली ध्यानाला बसले होते . तेथे त्यांनी अखंड एकोण पन्नास दिवस तपश्चर्या केली तेव्हा त्यांना साक्षात्कार झाला. सिद्धार्थ यांना महात्मा बुद्ध म्हटले जाऊ लागले. ज्या पिंपळाच्या झाडाखाली त्यांना ज्ञानाची प्राप्ती झाली ते झाड म्हणजे बोधिवृक्ष आणि त्या झाडाच्या आसपासचा परिसर म्हणजे बोधगया म्हणून ओळखले जाऊ लागले. गौतम बुद्धांनी मानवाला अत्त दीप भव म्हणजे स्वयंप्रकाशित व्हा हा संदेश दिला आहे. कोणी कितीही उपदेश केला तरी आपल्याला आपला मार्ग निवडायचा आहे... म्हणूनच ते म्हणतात ..

अत्त दिप भव। तू स्वयं दीप हो..
दया धर्मशांतीच्या पथाचा पथिक तुझा तूच हो...
तू स्वयं दीप हो..
अत्त दीप भव स्वयं दीप हो...
तू अविश्रांत सामर्थ्य उरि घे, सुर्याचे रुप हो..
तू स्वयं दीप हो..
तू कळ्या फुलातील कोमलता हो सुगंध आनंद हो, तू स्वयं दीप हो..
चैतन्य अहिंसा सत्य दयेचे तू मूर्त रूप हो.. तू स्वयं दीप हो..

भगवान गौतम बुद्धांच्या मार्गदर्शनाचा अर्थ सांगणारे कवी शांताराम नांदगावकर यांनी लिहिलेले हे गीत आहे. त्यात बुद्धांच्या शिकवणीचे सर्व सार आहे.

बुद्ध पौर्णिमा साजरी करत असताना सगळ्यांनी भगवान गौतम बुद्धाच्या या प्रेरणादायी विचारांचा अभ्यास व वाचन नक्कीच करायला हवे.

बुध्द पौर्णिमेच्या शुभेच्छा.!



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. (जळगांव)**
**मोबा.८९९९५६६९१७**

## वाचकांचे मनोगत

### नृसिंह अवतार!

महाराष्ट्रात भगवान नृसिंह अनेकांचे कुलदैवत आहे. त्यांच्या घरी भगवान नृसिंहाचे नवरात्र श्रद्धेने पार पाडले जातात. श्री विष्णूचे अवतार असलेले भगवान नृंसिह यांचे रूप दिसायला जरी उग्र असले तरी ते दुष्ट शक्तींसाठी ! भक्तांसाठी तर भगवान नृसिंह हे कृपाळू आहेत. भक्तांचे दुःख, कष्ट, संकटांचे हरण करणारे आहेत. भगवंताच्या अवताराची कथा सर्वांनाच माहित आहे. भक्त प्रल्हादाचे हिरण्यकश्यपूपासून रक्षण करून हिरण्यकश्यपू या दुष्ट राक्षसाचा अंत करण्यासाठी साक्षात श्री नारायणाने नृसिंह अवतार धारण केला होता. असे म्हणतात, भगवंत भक्तीचा भुकेला आहे. भक्ती म्हणजेच भगवंतावर असलेले निस्सीम प्रेम ! सध्याची परिस्थिती पहाता आपण प्रत्येकाने भगवंताचा भक्त बनण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे वाटते. याही काळात भगवंत कोणाच्या तरी माध्यमातून आपल्यासाठी धावून येतो, याची प्रचिती प्रत्येकाने घेतलेली असते. भगवान नृसिंहाची उपासना म्हणजे केवळ उपवास, आरती करणे, अखंड दिवा लावणे इतकेच नाहीये; तर आपल्यातील हिरण्यकश्यपू रुपी दोष, विकार हे घालवून आपले अंत करण भक्त प्रल्हादा सारखे स्वच्छ व निर्मळ बनवणे. निर्मळ अंत करणानेच भगवंताची भक्ती करता येते. तेव्हाच खरे भक्त बनता येते, असे वाटते.

**अक्षता चौधरी, परभणी**

शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

## जाफराबाद ते जालना बस सेवा सुरु होणार

भोकरदन । प्रतिनिधी - जाफराबाद ते जालना मार्गे माहोरा, बरंजळा साबळे, नळणी बरड, नळणी चौफुली, समर्थनगर नळणी, जवखेडा ठोंबरे- केदारखेडा, राजुर, जालना बससेवा सुरु करण्यात यावा ही मागणी भोकरदन शिवसेना उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी मागील काही दिवसांपासून लावून धरली होती. तसेच वेळप्रसंगी आत्मदहन करण्याचा इशाराही परिवहन महामंडळाला दिला होता. याची दखल घेवून १५ जुनपासून बससेवा सुरु करणार असल्याचे पत्र ठोंबरे यांना परिवहन मंडळाने दिले आहे. त्यामुळे अखेर अनेक महिन्यांपासून करत असलेल्या पाठपुराव्याला आणि मागणीला यश आले आहे.



महामंडळ जालना विभागाकडे बसेस तसेच चालक, वाहक यांची कमतरता असल्याने आपण मागणी केल्याप्रमाणे बससेवा १५ जून पासून सुरु करण्यात येईल. त्यामुळे आपले आत्मदहन आंदोलन मागे घेण्यात यावा, असेही विभाग नियंत्र रा. प. जालना यांनी कळविले आहे.

# माध्यम गोंधळ: संनियंत्रण आवश्यक

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी कुटुंबीयांसह फिरायला आलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २६ पर्यटकांचे त्यांच्या कुटुंबियांसमोर जीव घेतले.या भेकड हल्ल्याचा पाकिस्तान मधील दहशतवाद्यांचे नेम धरून ९ तळ उध्वस्त करून भारताने योग्य तो बदला घेतलाच पण पुढे असे हल्ले होणार नाही,याची तजवीज केली. ही कारवाई करीत असताना,पाकिस्तान च्या लष्कराचे आणि महत्वाचे म्हणजे पाकिस्तानमधील आम नागरिकांची जीवित व वित्त हानी होणार नाही, याची पुरेपूर दक्षता भारतीय लष्कर आणि हवाई दलाने घेतली आहे.या सर्व कारवाईबाबत केवळ देशातील जनतेलाच नव्हे तर संपूर्ण जगाला योग्य माहिती मिळावी म्हणून पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात आली आहे.

खरं म्हणजे,आजच्या या सर्व संवेदनशील,गंभीर पार्श्वभूमीवर प्रसार माध्यमांनी विशेषतः वृत्त वाहिन्या आणि समाज माध्यमांनी अतिशय जबाबदारीने आपली भूमिका पार पाडण्याची नितांत गरज आहे.विश्वासार्हता हा कुठल्याही माध्यमाचा आत्मा असतो.पण काही वृत्त वाहिन्या आणि समाज माध्यमांनी जणू आपली विश्वासार्हता असली काय आणि नसली काय? अशी अत्यंत बेजबाबदार पणाची भूमिका घेऊन माध्यमांच्या मूलभूत तत्वांनाच गुंडाळून ठेवले आहे. या आपल्या बेजबाबदार बातमीदारीमुळे, खरं म्हणजे याला बातमीदारी म्हणणे सुद्धा चूकच आहे, नागरिकांमध्ये किती अस्वस्थतेचे,सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊन,त्याचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर,मानसिक,भावनिक,आर्थिक बाबींवर परिणाम होत असेल,याचा जराही विचार काही बेजबदार वाहिन्या आणि समाज माध्यमे करताना दिसत नाहीय ही केवळ शरमेची बाब नाहीय तर या त्यांच्या वागण्याची सरकारने,संबंधित यंत्रणांनी गंभीरपणे दखल घेऊन तत्काळ योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे.

या बाबतीत , चुकीच्या बातम्यांचे (फेक न्युज) खंडन करण्यासाठी भारत सरकारच्या पत्र सूचना कार्यालयाने यंत्रणा कार्यान्वित केली आहे.पण अफवा पसरण्याचा वेग हा सत्य पसरण्यापेक्षा हजारपटीने अधिक असतो,त्यात आजच्या अत्याधुनिक माध्यम तंत्रज्ञानामुळे त्याला एका क्षणाचा सुद्धा वेळ लागत नाही,ही वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रसारित झालेल्या बातम्यांची शहानिशा करून या बातम्या खोट्या आहेत, हे पत्र सूचना कार्यालयाने सांगे पर्यंत महत्वाची वेळ निघून गेलेली असते आणि व्हायची ती हानी होऊन गेलेली असते. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेऊन मला एक जो उपाय सुचतो तो म्हणजे सार्वत्रिक निवडणूक कालावधीत , भारत निवडणूक आयोग ज्या पद्धतीने संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रसार माध्यम संनियंत्रण समित्या नेमते ,त्या धर्तीवर भारत सरकार ने तात्काळ जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रसार माध्यम संनियंत्रण समित्या स्थापन करून चुकीच्या, खोट्या, दिशाभूल करणाऱ्या बातम्या,वृत्तांत,मुलाखती, चर्चा आयोजित करून प्रसारित करीत आहेत,त्यांची नोंद घेऊन अशा वाहिन्या , समाजमाध्यमे, व्यक्ती आणि अन्य जी काही व्यासपीठे असतील त्यांच्यावर तत्काळ बंदी घातली पाहिजे. माध्यमातील काही जणांच्या अशा बेजबाबदार, अविवेकी वागणुकीमुळे केवळ देशांतर्गत दुष्परिणाम होत नसून जगात भारताचे,भारतीय माध्यमांचे किती हसे होत असेल, देशाबाहेरून येणाऱ्या प्रवाशांच्या येण्यावर, देशाबाहेर जाऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांवर ,परदेशात राहणाऱ्या मूळ भारतीय नागरिकांच्या मनस्थितीवर काय परिणाम झाला आहे, होत आहे याची किंचितशी देखील तमा न बाळगणाऱ्या ,आपल्या व्यावसायिक उत्तरदायित्वाची जाणीव नसलेल्या माध्यम संस्था आणि व्यक्ती यांची माध्यमात काम करण्याची लायकी नाही हे जाणून घेऊन त्यांच्यावर कायमची बंदी घालणं ही आजच्या घडीला अत्यंत महत्त्वाची बाब आहे. मला आशा आहे की,माझे उपरोक्त विचार वाचून यथायोग्य जनजागरण होऊन, ते भारत सरकार आणि सर्व राज्य सरकारे,प्रसार माध्यमे यांच्या पर्यंत पोहोचून , सध्या सुरू असलेल्या माध्यम गोंधळाला पायबंद बसेल. जयहिंद.

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००.**

## पान १ वरुन

### परराष्ट्र मंत्रालयाकडून ...

सरकार पुरस्कृत दहशतवादाचं कंबरडं मोडण्याचं काम भारतानं केलं.

**मोठे दहशतवादी ठार**

पाकिस्तान, पीओकेमध्ये एअर स्ट्राईक करुन भारतानं अनेक मोठ्या दहशतवाद्यांना यमसदनी धाडलं. त्यांची यादी समोर आलेली आहे. यात जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अजहरचा भाऊ अब्दुल रौफ अजहर, लष्कर-ए-तय्यबाचा कमांडर अबु जुंदाल, जैशसाठी आर्थिक रसद गोळा करणारा हाफिज मोहम्मद यांचा समावेश आहे. याशिवाय मुदस्सर खादियान खास, हाफिज मोहम्मद जमील, मोहम्मद युसूफ अजहर, खालिद (अबू अकाशा), मोहम्मद हसन खान यांचाही समावेश आहे.

२००१ मधील संसदेवरील हल्ला, २६/११ मुंबईवरील हल्ला, पहलगाम हल्ल्याच्या सूत्रधारांना संपवण्यासाठी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवादी गटांच्या मुख्यालयांना लक्ष्य करण्यात आलं. दहशतवाद्यांना संपवण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊ शकतो, हा संदेश या निमित्तानं भारतानं जगाला दिला.

**एक मजबूत देश म्हणून धमक**

पाकिस्तानविरोधात धडक कारवाई करत भारतानं आपण एक मजबूत देश असल्याचं जगाला दाखवून दिलं. अण्वस्त्र देशात घुसून एअर स्ट्राईक करणारा पहिला देश म्हणून भारताची नोंद झाली. कोणत्याही देशाची फिकीर न करता भारतानं केलेली कारवाई चर्चेचा विषय ठरली. दहशतवाद खपवून घेणार नाही, हा स्पष्ट संदेश भारतानं जगातील सगळ्या देशांना दिला.

**पाकिस्तानी सैन्याचे दहशतवाद्यांसोबते संबंध समोर**

दोन्ही देशांमध्ये तणाव असताना भारतानं पाकिस्तानी सैन्याचे दहशतवाद्यांशी असलेले सुमधूर संबंध जगासमोर आणले. भारताच्या एअर स्ट्राईकमध्ये बडे दहशतवादी मारले गेले. त्यांच्या अंत्यविधीला पाकिस्तानी सैन्याचे अधिकारी, नेते उपस्थित राहिले. त्यांचे फोटो समोर आले. त्यांच्या आधारे भारतानं जगभरात पाकिस्तानचा बुरखा फाडला.

**पाकिस्तानच्या हवाई सुरक्षा यंत्रणेला खिंडार**

भारतानं ७ मेपासूनच पाकिस्तानच्या पोकळ हवाई सुरक्षा यंत्रणेची पोलखोल केली. एअर स्ट्राईक करताना भारतानं पाकिस्तानात १०० किमीपर्यंत क्षेपणास्त्रं डागली. पण पाकिस्तानच्या तकलादू हवाई सुरक्षा यंत्रणेला याचा पत्ताही लागला नाही.

**हवाई सुरक्षा यंत्रणेची ताकद दाखवली**

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्ताननं सलग तीन दिवस भारतावर हवाई हल्ले केले. शेकडो ड्रोन्स डागण्यात आले. क्षेपणास्त्रं सोडण्यात आली. पण भारताच्या एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं पाकिस्तानचे सगळे हल्ले हाणून पाडले. भारताची हवाई सुरक्षा यंत्रणा किती मजबूत आहे, याची झलक गेल्या ३ दिवसांत सगळ्या जगानं पाहिली.

**पाच दशकांमधील सगळ्यात मोठी कारवाई**

१९७१ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध झाल्यानंतर गेल्या ५४ वर्षांत भारताच्या तिन्ही दलांनी मिळून कोणतीही संयुक्त कारवाई केली नव्हती. पण ऑपरेशन सिंदूर तिन्ही दलांनी पाच दशकांनंतर सगळ्यात मोठी कारवाई करत पाकिस्तानचं कंबरडं मोडलं.

**फक्त पीओके नव्हे, पाकिस्तानात घुसून दणका**

१९७१ नंतर पहिल्यांदाच भारतानं पाकिस्तानात घुसून कारवाई केली. गेल्या पाच दशकांत भारतानं केलेल्या कारवाया सीमावर्ती भाग, पीओकेपर्यंत मर्यादित होत्या. पण ऑपरेशन सिंदूर राबवताना भारतानं पाकिस्तानी जमिनीवरील दहशतवादी तळ जमीनदोस्त केले.

### वीज ग्राहक ...

ग्राहक आपले वीजबिल वेळेवर भरेल.

अखंडित वीजपुरवठ्यासाठी मान्सूनपूर्व देखभाल-दुरस्तीची कामे १५ मेपर्यंत पूर्ण करावीत. फिडरवर कमीत कमी ट्रिपिंग व्हाव्यात, याकडे क्षेत्रीय अभियंते, कर्मचाऱ्यांनी लक्ष द्यावे.

जिल्ह्यात वीजचोरीचे प्रमाण चिंताजनक आहे. यात बदल करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. प्रत्येक उपविभागामध्ये वीजचोरी पकडण्यासाठी धडक मोहीम राबवा. प्रत्येक महिन्याला प्रत्येक उपविभागाने कमीत कमी १०० वीजचोऱ्या पकडल्या पाहिजेत, असे निर्देश औंढेकर यांनी दिले.

सौर कृषिपंपांच्या जोडणीमध्ये जिल्ह्याने उत्कृष्ट काम केले आहे. सर्व कर्मचाऱ्यांना त्याचे श्रेय आहे. ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून नियमानुसार पात्र ग्राहकांना सौरपंप मिळाले पाहिजे. चुकीच्या पद्धतीने किंवा नियमबाह्यरीत्या सौरपंप लावण्यात येऊ नयेत. रूफ टॉप सोलर योजनेत मात्र जिल्ह्यात समाधानकारक काम झाले नाही. वीजगळती अधिक असणाऱ्या भागांत ही योजना राबवण्यासाठी विशेष प्रयत्न करा. १०० युनिटपेक्षा कमी वीजवापर असणाऱ्या ग्राहकांना प्रामुख्याने या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे, अशी सूचना औंढेकर यांनी केली.

तब्बल तीन तास चाललेल्या या संवाद मेळाव्यामुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांत नवचैतन्य निर्माण झाले. सूत्रसंचालन व्यवस्थापक (मानव संसाधन) डॉ.शिवाजी तिकांडे यांनी केले. कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील जनमित्र व यंत्रचालकांसह सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते तसेच मानव संसाधन व लेखा विभागाचे अधिकारी, कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### दृष्टि लायन्स ...

योजना हा होता. मार्गदर्शक, गणेश पवार कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शन केले या शिबिराचा ५० शेतकऱ्यांनी लाभ घेतला. शेतकऱ्यांसाठि असेच शिबिर पुढच्या महिन्यात ६ जून रोजी घेण्याचे आयोजित केले आहे. पुढील विषय आहेत. तूर,कापूस, सोयाबीन या पिकाबद्दल माहिती.व मार्गदर्शक आहेत कृषी अधिकारी रामराव रोडगे. तरी सर्व शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा.असे आव्हान दृष्टी लॉयन्स नेत्रालय अध्यक्ष, मनोहर खालापूरे यांनी केले आहे. यावेळी मनोहर खालापूरे.मुकुंद शेपाळ. विश्वंबर बहिवाल शेतकरी.व इतर उपस्थित होते.

### बनावट लग्न ...

बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे, यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, मपोहेका / भांडेकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल देशपांडे, पोलीस नाईक तिडके, पोलीस कॉन्स्टेबल शिवरकर, पोलीस कॉन्स्टेबल गावंदे, पोलीस कॉन्स्टेबल धोंडगे, कॉन्स्टेबल जगदाळे, पोलीस कॉन्स्टेबल शिरसागर, यांनी केली आहे. पुण्याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ करीत आहेत.

### जालना क्रेडाईतर्फे ...

उपस्थिती होती.

या सप्ताहात कामगारांसाठी मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. त्यात ६६ कामगारांची नेत्र तपासणी करून त्यांना चष्मे वाटण्यात आले. यावेळी अमोल जाधव यांनी कामगारांसाठीच्या राज्य व केंद्र शासनाच्या नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यूप्रसंगी अर्थसहाय्य, मुलीच्या विवाहासाठी निधी, प्रधानमंत्री जीवनज्योती योजना, आरोग्य तपासणी, सुरक्षा विमा, जनधन खाती आणि गृह उपयोगी वस्तू वाटप आदी योजनांची माहिती दिली. जालना क्रेडाईच्यावतीने कामगारांना सुरक्षा संच वाटण्यात येऊन त्यांना याचे महत्त्व समजावण्यात आले. बँक खात्याविषयी माहिती देत शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार करण्यात आला.

क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार म्हणाले की, कामगार हा आमच्या व्यवसायाचा आधारस्तंभ आहे. त्याचे आरोग्य, कौशल्य विकास व कल्याणासाठी आम्ही बांधील आहोत. शासनाच्या योजना थेट बांधकाम साईटवर पोहोचवण्याचा प्रयत्न क्रेडाईकडून केला जाईल, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन मराठे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार अविनाश भोसले यांनी मानले.

### महाबोधी बुद्ध ...

करण्यात आलंय. महाबोधी बुध्द विहार हे बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी जालनेकराचा सहभाग नोंदविण्यासाठी हा जथ्था जालन्याहून बुध्द गया येथे गाला आहे. यामध्ये भन्ते दीपकर, भन्ते शीलरत्न, भन्ते संघरत्न, महेंद्र बनकर, फकिरा वाघ, लिंबाजी वाहूळकर यांच्यासह बौध्द अनुयायी आहेत.



# महाराणा प्रतापसिंह जयंती महोत्सवात शिवकालीन शस्त्रप्रदर्शन, मल्लखांब आणि राष्ट्रभक्तीचा अविस्मरणीय संगम

**जालना । प्रतिनिधी** - महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती, सकल क्षत्रिय राजपूत समाज, महाराणा प्रतापसिंह फाउंडेशन, प्रतिष्ठान मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ९ मे रोजी हिंदूसूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा जयंती सोहळा दुग्धाभिषेक, ध्वजारोहण, शिवकालीन शास्त्रांची प्रदर्शनी, महिलांसाठी कराटे प्रशिक्षण, रक्तदान शिबिर, आतषबाजी आदी विविध उपक्रमांनी साजरा साजरा झाला. हा सोहळा क्षात्रतेज, इतिहासभान आणि राष्ट्रप्रेम जागवणारा ठरला. शिवकालीन विविध शस्त्रांचा अनुभव व मल्लखांबाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकामुळे जनता हरखून गेली.

शुक्रवारी सकाळी मस्तगड येथील मंमादेवी चौकात महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पोलीस बँडपथकाने सादर केलेल्या मानवंदनेने वातावरण भारावून गेले. त्यानंतर ध्वजारोहण झाले. यानंतर आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ५२ जणांनी रक्तदान करून समाजसेवेची जाणीव व्यक्त केली. सायंकाळी ५ वाजता पार पडलेल्या मल्लखांबाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. आयोजित करण्यात आलेल्या शिवकालीन शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनाने इतिहासाचा जिवंत अनुभव दिला. तलवारी, भाले, गज, दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचे स्मरण आणि काळाच्या पडद्यामागे डोकावून पाहण्याची संधीच ठरली. महिलांसाठी स्वसंरक्षणाचे कराटे प्रशिक्षण उत्साहात पार पडले. ७ वाजता खुशालसिंह ठाकुर व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री मंमादेवीची आरती करण्यात आली. यावेळी सोलापूरच्या प्रसिद्ध डीजेच्या वादनाने संपूर्ण परिसर मंगलमय झाला.

रात्री ८ वाजता पार पडलेल्या जयंती उत्सव मुख्य कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. कल्याण काळे, आ. अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, पंडितराव भुतेकर, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, संतोषराव मोहिते, जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, गणेशराव राऊत, विजय चौधरी, विनोद यादव, दिनेश भगत, सुरेश राऊत, गणेश सुपारकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. जयंती समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर आणि पदाधिकाऱ्यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आ. खोतकर म्हणाले की, महाराणा प्रताप यांच्या शौर्याचे सर्वोच्च उदाहरण म्हणजे हल्दीघाटीचे युद्ध. महाराणा प्रताप यांच्याकडे फारच थोडी सेना होती, तरीसुद्धा त्यांनी मुघल सेनेला जोरदार प्रतिकार केला. हल्दीघाटीनंतर महाराणा प्रतापने हार मानली नाही. त्यांनी जंगलात राहून, अन्नपाण्यावाचूनही संघर्ष चालू ठेवला. स्वतः आणि कुटुंबीयांसोबत कठीण परिस्थितीत जगत राहिले, परंतु मेवाडच्या स्वातंत्र्यावर कधीही तडजोड केली नाही, ते म्हणाले.

आ. कैलास गोरंट्याल यांनी एक चुटकी सुंदर की किंमत तुम क्या जानो बाबू, या शेर शायरीने भाषणाची सुरुवात करून, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तान कशी किंमत मोजत आहे, हे सांगून पाकिस्तान विरुद्ध केंद्र सरकारने उचललेल्या पावलाचे कौतुक केले. भास्करराव आंबेकर म्हणाले की, शेकडो वर्षानंतरही महाराणा प्रतापसिंह यांचे कार्य प्रेरणा देत असून स्वाभिमानासाठी लढणारा योद्धा अशी त्यांची ख्याती आहे. या देशाचे सैन्य शत्रूवर तुटून पडते तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांचे शौर्य अधोरेखित होते, असे ते म्हणाले. प्रास्ताविकपर भाषणात समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर म्हणाले की, मेवाड ही वीरांची भूमी आहे. मातृभूमीचा सन्मान आणि रक्षणासाठी महाराणा प्रतापसिंह यांनी सर्वस्वाचा त्याग केला. त्यांचा आदर्श प्रत्येक तरुणाने डोळ्यासमोर ठेवावा, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचा समारोप भव्य आतषबाजीने झाला. या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे राजेंद्रसिंह ठाकूर, प्रा भगवानसिंह डोभाळ, बजरंगसिंग राजपूत, बाबासिंग बायस, नारायण सूर्यवंशी, सुमेर ठाकूर, लखन ठाकूर, देवेंद्र बुंदेले, नागेश बेनिवाल, शक्ती राजपूत, विकी राजपूत, प्रा. गौरव ठाकूर, किशोर माधववाले, राहुल राजपूत, कुणाल ठाकूर, नीरज ठाकूर, अमोल ठाकूर, पंकज अंधारे, शिवम राजपूत यांच्यासह पदाधिकारी आणि सकल क्षेत्रीय राजपूत समाजाने विशेष परिश्रम घेतले.










हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.